नि.क्र. ८ (1) सं.फौ.ख.क्र.२२/२०२४

शासन वि. गणेश शिंदे

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः कविता किशोर देशमुख

वयः ४७ वर्षे, व्यवसायः गृहीणी,

राहणार –शेणवई, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांच्यामार्फत :</u>**

०१. आमच्या घरी माझ्या दोन मुले, मुलगी काजल, मी व पती असे एकत्र राहतो. माझी मुलगी काजल पोलीस भरतीसाठी सराव करते. घटना दि.२२.१२.२०२३ रोजी सकाळी ०६.०० ते ०६.३० वाजेच्या सुमारास घडली. त्यावेळी माझी मुलगी अलिबाग–रोहा रोडला रनिंगसाठी गेली होती. काजल रनिंग करुन घरी आली असता तिने मला गणेश शांताराम शिंदे याने येवुन तिचा हात पकडल्याचे सांगितले. तो तिला ‘माझे सोबत चल’ असे म्हणाला. काजलने त्याचा हात झटकुन त्याच्या कानफटीत मारली असे तिने मला सांगितले. इज्जतीच्या भितीने आम्ही सदर बाब कोणालाही सांगितली नाही.

०२. त्यानंतर दुस–या दिवशी म्हणजे दि.२३.१२.२०२३ रोजी काजल पुन्हा रनिंगला गेली असता अर्धा रस्त्यातुन गणेश दिसला म्हणुन मागे निघुन आली. त्यानंतर ०८.०० ते ०८.३० वाजेच्या सुमारास ती आमच्या घरासमोर असलेल्या नळावर पाणी भरत होती. त्यावेळी मी माझ्या घरात स्वयंपाक करत होते. गणेश तिला वेगवेगळे घाणेरडे इशारे करत होता. त्यामुळे काजल त्याला शिवीगाळ करु लागली. आरडाओरडा झाल्यानंतर मला सदर बाबत समजले. मी घरातुन बाहेर आले असता भांडणाचे वातावरण होते. काजल व गणेश भांडण करत होते. मी काजलला विचारले असता गणेश तिला बोटाने

घाणेरडे इशारे करत असल्याचे सांगितले. ते ऐकुन मी रागाने गणेशला मारण्यासाठी चप्पल घेतली. मी त्याला शिवीगाळ केली पंरतु चप्पल मारली नाही. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. काजलने आरोपीविरुध्द फिर्याद दिली. पोलीसांनी सदर बाबत माझ्याकडे चौकशी केली होती व माझा जबाब घेतला होता. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकते. आज रोजी तो न्यायकक्षात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. पी. सानप यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरापासुन अलिबाग–रोहा रोडपर्यंतचे अंतर हे या न्यायालयापासुन रोहा बसस्टँड जेवढया अंतरावर आहे त्यापेक्षा जास्त होईल. मी काजल बरोबर सकाळी रनिंगसाठी जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे घर आमच्या घरासमोर असुन दोघांच्या घरांमधुन रस्ता गेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो गावातील मुख्य रस्ता असुन ग्रामस्थ वापरतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या घराच्या आजुबाजुला लागुन गावातील इतर लोकांची घरे आहेत. नळाचे पाणी सकाळी ०८.०० वाजता येते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरासमोरचा नळ गावातील मुख्य रस्त्याला खेटुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सकाळी ०७.०० ते ०९.०० या वेळेत गावातील शेतात तसेच कामावर जाणारे लोक, शाळेत जाणारे विदयार्थी यांची मुख्य रस्त्यावर वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, गावामध्ये भांडणे झाल्यास आजुबाजुचे लोक लगेच जमा होतात. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य रस्त्याला लागुन नळ, त्यानंतर आमचे अंगण, त्यानंतर पडवी, हॉल व त्यानंतर स्वयंपाक घर अशी आमच्या घराची रचना आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या स्वयंपाक घरातुन नळ दिसत नाही. नळावरची घटना घडली त्यावेळी आजुबाजुचे लोक जमा झाले नव्हते.

०४. दि.२३.१२.२०२३ रोजी गणेशने काजल नळावर पाणी भरत असताना तिला

घाणेरडे इशारे केले असे मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते. मला चश्म्याशिवाय वाचता येत नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतल्यानंतर तो मी वाचुन पाहिला होता. तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर लिहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.२३.१२.२०२३ रोजी नळावर घडलेली घटना ही मला मी घरातुन बाहेर आल्यानंतर काजलने सांगितली.

०५. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरात पाळीव कुत्रा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचा कुत्रा मोकाट सुटतो व आजुबाजुच्या लोकांच्या अंगावर धावत जावुन त्यांना चावण्याचा प्रयत्न करतो. हे म्हणणे खरे नाही की, कुत्र्यावरुन आमचे गावातील मुख्य रस्त्यावरुन जाणा-या येणा-या लोकांशी वाद झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्या कुटुंबात फिर्याद दाखल करण्याच्या एक वर्षापुर्वीपासुन वाद आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, दि.१७.१०.२०२३ रोजी महेंद्र देशमुख याने माझा मुलगा कल्पेश विरुध्द कुत्र्याच्या कारणावरुन रोहा पोलीस ठाण्यात अदखलपात्र तक्रार क्र.५१६/२०२३ दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद दाखल करण्यापुर्वी आरोपी व आमच्या कुटुंबाचे संबंध चांगले होते असे मी खोटे सांगत आहे. हे मला आठवत नाही की, आरोपीची आई सुनिता हिने माझ्याविरुध्द अदखलपात्र तक्रार क्र.५२९/२०२३ दि.२५.१०.२०२३ रोजी दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणाव्यतिरिक्त प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद दाखल करण्यापुर्वी मी रोहा पोलीस ठाण्यात केव्हीही गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२६.१०.२०२३ रोजी आरोपीविरुध्द अदखलपात्र तक्रार क्र.५३१/२०२३ दाखल केली होती.

०७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कामधंदयानिमित्त मुंबई येथे असतो. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तो चार दिवस मुंबई व चार दिवस गावात असतो तसेच तो गावात जास्त असतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०.१२.२०२३ ते २५.१२.२०२३ पर्यंत आरोपी गावात नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्या कुटुंबात प्रस्तुत

प्रकरणातील फिर्याद दाखल करण्यापुर्वीपासुन वाद होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीने महिला म्हणुन दिलेल्या खोटया फिर्यादीच्या अनुषंगाने तिला मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.01.16 11:33:43 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)
दि. १५.०१.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.